**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी अधिसुचित करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१५/प्र.क्र. ४८०/ सिंव्य (कामे)

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक:- १५ जुलै, २०१५

<u>संदर्भ</u> :- सन-२०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५

<u>प्रस्तावना:-</u>

सार्वजनिक जीवनातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रांच्या शाश्वत विकासासाठी सुप्रशासन अत्यावश्यक आहे. प्रशासनातील पारदर्शकता, उत्तरदायित्व व प्रतिक्रियाशीलता हे सुप्रशासनाचे तीन अत्यावश्यक घटक आहेत. जनता व प्रशासन यामधील संबंध सुधारण्यासाठी व ते बळकट करण्यासाठी, महाराष्ट्र शासनास, प्रशासनामध्ये उत्तरदायित्व जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याची तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ दि. २८/०४/२०१५ रोजी राज्यात लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागू झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीच्या आत या अध्यादेशाखाली पुरविण्यात येणा-या लोकसेवेबाबतचा तपशील अधिसुचित करणे आवश्यक आहे. यामध्ये विभागाद्वारे पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा घोषित करून त्याप्रमाणे संबंधित सेवा पुरविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे:-

**शासन निर्णय:-**

(१) या शासन निर्णयाच्या सहपत्रामध्ये नमूद केलेल्या एकूण १० सेवा राज्यातील सर्व प्रदेश कार्यालयांनी कलम ३ अनुसार अधिसुचित कराव्यात.

(२) जलसंपदा विभागाने पुरवावयाच्या लोकसेवांची सुची, नियत कालमर्यादा, विहित नमुना व फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी आणि द्वितीय अपिलिय अधिकारी यांचा तपशिल कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रर्दशित करण्यात यावा.

(३) शासन निर्णयासोबतच्या सहपत्रामध्ये नमूद केलेल्या १० सेवा, आवश्यक कागदपत्रे व नियत कालावधी यामध्ये संबंधित प्रदेश कार्यालयांना बदल करता येणार नाही.

(४) संदर्भ अध्यादेशामधील कलम ३ नुसार सेवा अधिसूचित करणे व त्याची अंमलबजावणी करण्याबाबतची कार्यवाही दि.२७ जुलै,२०१५ पर्यंत पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित प्रादेशिक मुख्य अभियंता यांचेवर राहील.

(५) संदर्भ अध्यादेशामधील तरतूदीनुसार अधिसूचित केलेल्या सेवा पुरविण्याची जबाबदारी सोबतच्या सहपत्रामध्ये निर्देशित केलेल्या अधिका-यांवर राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१५०७१५१५३६४३१८२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राने राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Namita Gaurav Baser

Digitally signed by Namita Gaurav Baser
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Executive Engineer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Namita Gaurav Baser
Date: 2015.07.15 15:39:59 +05'30'

**(न.गौ.बसेर)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत:**

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधान सचिव
३. मा.राज्य निवडणुक आयोग यांचे कार्यालय.
४. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
६. सर्व सन्मानीय विधानसभा/विधानपरिषद व संसद सदस्य.
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक.
८. मा.लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय.
९. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. मुख्यमंत्री महोदय यांचे जनसंपर्क अधिकारी.
११. सर्व कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधिक्षक अभियंता/कार्यकारी अभियंता.
१२. जलसंपदा विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव/अवर सचिव.
१३. कार्यासन सिंव्य (कामे) निवडनस्ती.

शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्रमांक संकीर्ण २०१५(प्रक्र ४८०/१५) सिंव्य(कामे) दिनांक १५ जुलै, २०१५ चे सहपत्र.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५
(कलम ३ अन्वये प्रादेशिक कार्यालयांनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील)

जलसंपदा विभागांतर्गत नागरिकांना द्यावयाच्या १० सेवा

| अ.क्र | सेवा क्रमांक | विषय | सेवा मागणीसाठी आवश्यक कागदपत्रे | सेवा उपलब्धतेसाठी आकारण्यात येणारे शुल्क | सेवा पुरविण्याचा कालावधी | पद निर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | व्दितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १. | सेवा क्र. १ | पाणीवापर संस्थेस देय पाणी हक्क मंजूरी देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | नि:शुल्क | १५ दिवस (हंगाम सुरु झाल्यानंतर) | संबधित शाखा अधिकारी | संबधित उप अभियंता | संबधित कार्यकारी अभियंता |
| २. | सेवा क्र. २ | पाणीवापर संस्थेस पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | नि:शुल्क | १५ दिवस | संबधित शाखा अधिकारी | संबधित उप अभियंता | संबधित कार्यकारी अभियंता |
| ३. | सेवा क्र. ३. | बिगर सिंचन पाणीपट्टी थकबाकी दाखला देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | नि:शुल्क | १५ दिवस | संबधित शाखा अधिकारी | संबधित उप अभियंता | संबधित कार्यकारी अभियंता |
| ४. | सेवा क्र. ४ | पाणीपट्टी देयक तक्रार निवारण करणे. | विहित नमुन्यातील अर्ज | नि:शुल्क | १५ दिवस | संबधित शाखा अधिकारी | संबधित उप अभियंता | संबधित कार्यकारी अभियंता |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५. | सेवा क्र. ५ | लाभक्षेत्राचा दाखला देणे. | विहित नमुन्यातील अर्ज, ७/१२ चा उतारा | नि:शुल्क | १ महिना | संबधित कार्यकारी अभियंता | संबधित अधिक्षक अभियंता | संबधित मुख्य अभियंता |
| ६. | सेवा क्र. ६ | ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगर पालिका, नगर परिषद, नगर पंचायत, कटक मंडळे (Cantonment Board) यांना घरगुती पाणी वापर परवाना देणे. | विहित नमुन्यातील अर्ज, योजनेचा नकाशा, संरेखा, ७/१२ चा उतारा, प्रमाणित अभियंत्याचा अश्वशक्ती याबाबतचा तांत्रिक अहवाल, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आराखडा व नकाशा (STP), सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे हमीपत्र. | नि:शुल्क | ३ महिने | संबधित कार्यकारी अभियंता | संबधित अधिक्षक अभियंता | संबधित मुख्य अभियंता |
| ७. | सेवा क्र. ७ | महानगर पालिका, खाजगी विकासक, विशेष नगर विकास प्रकल्प यांना घरगुती / औदयोगिक पाणी वापर परवाना देणे. | विहित नमुन्यातील अर्ज, म.जि.प्रा. प्रमाणित लोकसंख्या परिगणना व पाणीवापर, योजनेचा नकाशा, संरेखा, ७/१२ चा उतारा, हमीपत्र, प्रमाणित अभियंत्याचा अश्वशक्ती याबाबतचा तांत्रिक अहवाल, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आराखडा व नकाशा (STP), सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे हमीपत्र, विशेष नगर विकास प्रकल्पासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र. | नि:शुल्क | ६ महिने | संबधित कार्यकारी अभियंता | संबधित अधिक्षक अभियंता | संबधित मुख्य अभियंता |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | सेवा क्र. ८ | औदयोगिक प्रयोजनासाठी पाणी वापर परवाना देणे. | विहित नमुन्यातील अर्ज, संस्था नोंदणी प्रमाणपत्र, योजनेचा नकाशा, संरेखा, ७/१२ चा उतारा, उदयोग सूरू करण्याचे प्रमाणपत्र, महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे कन्सेन्ट टू एस्टब्लिश / पर्यावरण प्रमाणपत्र, हमीपत्र, प्रमाणित अभियंत्याचा अश्वशक्ती याबाबतचा तांत्रिक अहवाल, सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आराखडा व नकाशा (STP), सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याचे हमीपत्र, स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र. | नि:शुल्क | ६ महिने | संबधित कार्यकारी अभियंता | संबधित अधिक्षक अभियंता | संबधित मुख्य अभियंता |
| ९. | सेवा क्र. ९ | नदी व जलाशयापासून अंतराचा दाखला देणे. | विहित नमुन्यातील अर्ज, ७/१२ चा उतारा, प्रस्तावित जागा व नदी / जलाशय दर्शविणारा गाव नकाशा. | नि:शुल्क | १ महिना | संबधित कार्यकारी अभियंता | संबधित अधिक्षक अभियंता | संबधित मुख्य अभियंता |
| १०. | सेवा क्र. १० | उपसा सिंचन परवानगी देणे. | विहित नमुन्यातील अर्ज, ७/१२ चा उतारा, ८अ चा उतारा. | नि:शुल्क | २ महिने | संबधित कार्यकारी अभियंता | संबधित अधिक्षक अभियंता | संबधित मुख्य अभियंता |